# कालमर्यादा

**क्रमांक** - पोमसं/३१/शासकीय अग्रीम/१८५/१६ मुंबई, दिनांक - ०५/०६/२०१७

**संदर्भ :-** या कार्यालयाचे समक्रमांकित परिपत्रकीय आदेश दि. ०१/०२/२०१७ (महाराष्ट्र पोलीस यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशीत केलेले आहेत.)

**विषय :-** शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना घरबांधणी अग्रीम/ मोटारवाहन अग्रीम/ संगणक अग्रीम मंजूर करण्याच्या अधिकाराबाबत.

*****

**परिपत्रकीय ज्ञापन :-**

या कार्यालयाचे संदर्भाधिन परिपत्रकीय आदेशानुसार "पोलीस विभागातील जे शासकीय अधिकारी/ कर्मचारी अग्रीम मंजूर होण्याकरिता विहित अटी/ शर्तींची पूर्तता करतात त्यांची अग्रिमाकरिता प्राप्त होणा-या अर्जाच्या दिनांकाच्या ज्येष्ठतेनुसार प्रतीक्षायादी विभागप्रमुखांनी ठेवावी, आणि पोलीस महासंचालक कार्यालयाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर अग्रीम मंजूरीचे आदेश निर्गमित करावेत", असे सूचित केले आहे.

२. असे अग्रीम मंजूर करण्यापूर्वी शासन नियमातील विहित तरतुदीनुसार कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक असते. अशी कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता सर्व घटक प्रमुखांनी पोलीस उपअधीक्षक/ सहा. समादेशक दर्जाच्या अधिका-यांची समन्वयक अधिकारी (Nodal Officer) म्हणून नेमणूक करावी. तसेच अग्रीम मंजूर झाल्यानंतर जामीन पत्र, गहाणखत (नोंदणीकृत) शासकीय विमा संचालनालयाकडे घराचा/ मोटार वाहनाचा विमा उतरविल्याची ते खात्री करतील. विभागप्रमुखांचे या प्रक्रियेवर नियंत्रण राहील. शासनाने पोलीस दलातील विविध घटक कार्यालयांच्या आस्थापनेवर स्थापत्य अभियंत्याची पदे निर्माण केली आहेत. त्यामुळे घरबांधणी संदर्भात त्यांचे प्रमाणपत्र/ सल्ला घेण्याबाबत घटक प्रमुखांना सूचित करण्यात येते.

३. सन २०१७-१८ च्या वित्तीय वर्षात शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर तो निधी विभागप्रमुखांना वाटप करण्यात येणार आहे. त्यामुळे निधीवाटप करण्यापूर्वी विभागप्रमुखांनी खालील विवरणपत्रातून **दि. ०९/०६/२०१७** पर्यंत त्यांची माहिती पाठवावी. त्यानंतरच त्यांच्या मागणीनुसार आणि निधीच्या उपलब्धतेप्रमाणे त्यांना निधीचे वाटप करण्यात येईल.

४. शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना घरबांधणी/ मोटारवाहन/ संगणक खरेदी करण्यासाठी अग्रिम मंजूर करण्याकरिता निधी मागणीपत्र :-

**घरबांधणी अग्रीम - उपलेखाशिर्ष- २०१**

| अ.क्र. | अर्जदारांची संख्या | मागणी केलेली एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

**मोटार वाहन अग्रीम - उपलेखाशिर्ष - २०२**

| अ.क्र. | अर्जदारांची संख्या | मागणी केलेली एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

F:/HBA MAIN/draft

संगणक अग्रीम - उपलेखाशिर्ष - २०४

| अ.क्र. | अर्जदारांची संख्या | मागणी केलेली एकूण रक्कम |
|---|---|---|
| १ | २ | ३ |

( अनुप कुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई/बिनतारी संदेश विभाग, पुणे/लोहमार्ग मुंबई/ रा.रा.पो.बल. मुंबई/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/नागरी हक्क संरक्षण,मुंबई
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/ महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर/विशेष सुरक्षा विभाग, दादर/फोर्सवन मुंबई/ मोटार परिवहन पुणे/रा.रा.पो.बल नागपूर / पुणे
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग/ बिनतारी संदेश व मोटार परिवहन सह)
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश विभाग, पुणे/गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे/ विशेष कृती दल, नागपूर/अंगुली मुद्रा केंद्र, गु.अ.वि.मुंबई
उपसंचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय, नाशिक
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये/अ.अ.प्र.के, नागपूर/ रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १ ते १६

F:/HBA MAIN/draft